

गड किल्ले आणि भ्रमंती का व कशी करावी हे सांगणारे पुस्तक

# गड-किल्ले आणि भ्रमंती





- विविध ६० प्रमुख किल्ल्यांची संपूर्ण माहिती.
- २५ प्रमुख किल्ल्यांचे नकाशे व चित्रे.
- गड किल्ले आणि भ्रमंतीला जात असल्यास पाळावयाची बंधने, नियम आणि घ्यावयाची काळजी.
- गडांचे विविध प्रकार : दुर्ग-किल्ला, भूईकोट-किल्ला व समुद्री-किल्ला यांची माहिती.

ॲड. अरुण गोविंद देशमुख

# मनोगत...

'गड, किल्ले आणि भ्रमंती' ह्या पुस्तकाचा विषय अनेक वर्षांपासून मनात घर करून होता. त्यासाठीचे माहितीचे संकलन करत करत अनेक मोहिमांच्या यशस्वी वाटचालीनंतर या विषयावर मी लिखाण सुरू केले.

शाळेपासूनच मला भटकंतीची आवड. सुरुवातीला आर.एस.पी.च्या हाईक ( भ्रमंती ) असो, विविध मित्रांबरोबर विविध गडांवर भटकणे असो, हे चालायचेच. श्री समर्थ व्यायाम मंदिरात यूथ हॉस्टेल ऑफ इंडियाची मुंबईची शाखा सुरू झाली व श्री. रत्नाकर कपिलेश्वर व श्री. अभय देशपांडे यांनी मेहनतीने अनेक वर्षे ही शाखा सुरू ठेवली. दर रविवारी विविध गड-किल्ल्यांवर जाणाऱ्या मोहिमा साहजिकच आकर्षित करू लागल्या. मी खो-खोतील माझ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना घेऊन यातील कैक मोहिमांत सहभागी झालो. यातील आठवणीतील म्हणजे आम्ही केलेली व्हॅली क्रॉसिंग, बदलापूरजवळील ब्रह्मा, विष्णू व महेश या सुळक्यांदरम्यान मी व माझ्या विद्यार्थ्यांनी ह्याचा प्रत्यक्ष थरार अनुभवला व मजाच आली. चंदेरीवर चढाई करताना पाठीवर दोन १०० फुटांच्या दोऱ्या, डोक्यावर एक जखमी विद्यार्थी व आम्हा दोघांच्या सॅक असा शारीरिक व २०-२२ जणांच्या छोट्यांच्या चमूची जबाबदारी अशी अवघड परिस्थितीही अनुभवली. रात्री नाणेघाटात पावसांच्या सरीतून वर आल्यावर गुहेमध्ये मराठी गाण्यांची अंताक्षरी व २०० जणांचा पिन ड्रॉप सायलेन्स व तल्लीनता आजही आठवणीत कोरून राहिली आहे. रायगड प्रदक्षिणा असो किंवा माहुलीची वा राजमाचीकरता भ्रमण असो, अशा अनेक आठवणी यूथ हॉस्टेलमुळे अनुभवायला मिळाल्या. अनेक भ्रमंतीच्या कामी सि. के. शिंदे, रत्नाकर कपिलेश्वर यांची नेहमीच साथ मिळाली.

श्री समर्थचे येथील यूथ हॉस्टेलचे कार्यालय बंद झाल्यावर वैयक्तिक अनेक मोहिमा काढीत राहिलो. कधी कधी दोन-तीन जणांचाच चमू असायचा. काही गडांच्या तर आम्ही प्रेमातच पडलेलो. पाली-सरसगड त्यातील एक. भर उन्हाळ्यात अनेक वर्षे नियमित मोहिमा काढल्या. पावसाळ्यात सागरगड अनुभव घ्यावा असाच तर लोहगड म्हणजे गळ्यातील ताईतच. श्रावणात भीमाशंकरला सोप्या मार्गाने चढून उतरताना शिडीवाटे खाली येतानाची मजाच काही औरच. मुंबईकरांसाठी ही हक्काची स्थाने आम्ही मनसोक्तपणे अनुभवली आहेत हे आनंदाने सांगतो.

खो-खो निमित्ताने अनेक ठिकाणी गेलो की जवळपासची प्रमुख देवस्थाने असो वा गड तिथे गेल्यापासून पाय काढायचा नाही. फिरताना भीषण वास्तव समोर येते ते म्हणजे या सर्व वास्तूंकडे आपण समस्त किती दुर्लक्ष करतो आणि मग हे पाहून असंख्य वेदना होतात. ज्या वास्तूत आपण शिरतो आहे ती किती मेहनतीने बांधलेली असेल हे अनुभव घेत मन भरून येते. महाराष्ट्र खास करून गड-किल्ल्यांच्या वैभवात श्रीमंत आहे. इतिहासाने सुपूर्द केले आहे ते जपणे, जोपासणे हे सर्वांचे कर्तव्य आहे, असे मला वाटते!

आपल्यासमोर 'गड, किल्ले आणि भ्रमंती'वरचे हे पुस्तक आणताना मला मनापासून आनंद वाटत आहे. सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाइप करीत लिहिलेले आहे. सदर पुस्तकाची बरीच भ्रमणे ही श्री समर्थ व्यायाम मंदिरात तसेच यूथ हॉस्टेलशी संबंधित असल्यामुळे शक्य झाल्याने या पुस्तकाद्वारे मी दोन्ही संस्थांचे ऋण व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रणसंस्कार श्री. मनोहर साळवी यांनी पाहिलेले आहे. सदर पुस्तकास दोन शब्द श्री. रत्नाकर कपिलेश्वर यांनी लिहिलेले असून या सर्वजणांचे मी मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

हे पुस्तक लिखाण करण्याची संधी मला मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांच्यामुळे मिळाली असून त्यांच्या ह्या पाठिंब्यामुळेच मला ही साहित्यसेवा अखंडित चालू ठेवता येत आहे व यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

हे पुस्तक गड-किल्ले आणि भ्रमंतीसाठी सामान्यात सामान्य व्यक्तीलाही सोपे जाईल अशा तऱ्हेने माहितीपूर्ण करून लिहिले आहे व त्याच्या भटकंतीसाठी याचा नक्कीच उपयोग होईल अशी मला आशा वाटते. यातील माहिती संकलन करून लिहिली असल्याने त्या त्या ठिकाणी मी गेल्यानंतर बऱ्याच वेळा काही बदल झाले असतील वा त्यात होत राहतात, त्यामुळेच पुस्तक वाचून आपणास काही दुरुस्ती/योग्य असे वाटल्यास किंवा काही सुचवायचे असल्यास तसे लेखी कळवावे. जेणेकरून त्याबाबत पुढील आवृत्तीत नक्कीच सुधारणा करण्याचा प्रयत्न करीन. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वर चरणी प्रार्थना करून मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम...

ॲड. अरुण गोविंद देशमुख

# अनुक्रमणिका

भाग १ : गड, किल्ले आणि भ्रमंती का करावी? ..... १२
भाग २ : गड, किल्ले आणि भ्रमंती यासाठी करावयाची तयारी ..... १५
भाग ३ : गड, किल्ले आणि भ्रमंती करताना पाळावयाचे नियम ..... १९
भाग ४ : गडांचे महत्त्व व निरीक्षण काय काय करावे? ..... २०
भाग ५ : विविध गडांची माहिती
१) रायगड ( ता. महाड, जि. रायगड ) ..... २१
२) प्रतापगड ( ता. महाबळेश्वर, जि. सातारा ) ..... २३
३) लोहगड ( ता. मावळ, जि. पुणे ) ..... २५
४) विसापूरचा किल्ला ( ता. मावळ, जि. पुणे ) ..... २७
५) मुरुड-जंजिरा ( ता. मुरुड, जि. रायगड ) ..... २९
६) वसईचा किल्ला ( ता. वसई, जि. पालघर ) ..... ३१
७) अर्नाळा ( ता. वसई, जि. पालघर ) ..... ३३
८) मलंगगड ( ता. कल्याण, जि. ठाणे ) ..... ३६
९) चंदेरी ( ता. कल्याण, जि. ठाणे ) ..... ३७
१०) सज्जनगड ( ता. जि. सातारा ) ..... ३९
११) दौलताबादचा देवगिरी किल्ला ( ता. जि. औरंगाबाद ) ..... ४२
१२) अलिबागचा किल्ला ( ता. अलिबाग, जि. रायगड ) ..... ४५
१३) सुवर्णदुर्ग ( जलदुर्ग ) ( ता. दापोली, जि. रत्नागिरी ) ..... ४७
१४) सिंधुदुर्ग ( जलदुर्ग ) ( ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग ) ..... ४९
१५) विजयदुर्ग ( जलदुर्ग ) ( ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग ) ..... ५१
१६) कर्नाळा ( ता. पनवेल, जि. रायगड ) ..... ५३
१७) पन्हाळा ( ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ) ..... ५५
१८) रांगणा ऊर्फ प्रसिद्ध गड ( ता. भुदरगड, जि. कोल्हापूर ) ..... ५७
१९) पुरंदर ( ता. पुरंदर, जि. पुणे ) ..... ६०
२०) जयगड ( जलदुर्ग ) ( ता. जि. रत्नागिरी ) ..... ६१
२१) पूर्णगड ( पावस-पूर्णगड, जि. रत्नागिरी ) ..... ६३
२२) साल्हेर ( ता. सहाणा, जि. नाशिक ) ..... ६४
२३) सरसगड ( ता. सुधागड-पाली, जि. रायगड ) ..... ६६
२४) अंकाई-टंकाई ( ता. येवला, जि. नाशिक ) ..... ६७
२५) हरिश्चंद्रगड ( ता. अकोले, जि. अहमदनगर ) ..... ६९
२६) सिंहगड ( ता. हवेली, जि. पुणे ) ..... ७१
२७) राजगड ( ता. वेल्हे, जि. पुणे ) ..... ७३
२८) शिवनेरी ( ता. जुन्नर, जि. पुणे ) ..... ७५
२९) तोरणा ( ता. वेल्हे, जि. पुणे ) ..... ७७
३०) मच्छिन्द्रगड ( ता. वाळवा, जि. सांगली ) ..... ७८
३१) नळदुर्ग ( भुईकोट किल्ला ) ( ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद ) ..... ७९

३२ ) मुल्हेर, मोरागड, हरगड ( ता. सटाणा, जि. नाशिक ) ........ ८२
३३ ) राजमाची ( पुणे ) ........ ८४
३४ ) वज्रगड ( ता. पुरंदर, जि. पुणे ) ........ ८६
३५ ) अजिंक्यतारा ( सातारा ) ........ ८८
३६ ) ईशाळगड ( ता. पनवेल, जि. रायगड ) ........ ९०
३७ ) विशाळगड ( ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर ) ........ ९२
३८ ) ब्रह्मगिरी ऊर्फ त्र्यंबकचा किल्ला ( ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक ) ........ ९४
३९ ) पद्मदुर्ग - कासा ( जलदुर्ग ) ( ता. मुरुड, जि. रायगड ) ........ ९६
४० ) अचला ( ता. कळवण, जि. नाशिक ) ........ ९८
४१ ) रावळ्या-जावळ्या ( ता. कळवण, जि. नाशिक ) ........ ९९
४२ ) हरिहरगड ( ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक ) ........ १०१
४३ ) रतनगड ( ता. अकोले, जि. अहमदनगर ) ........ १०३
४४ ) जीवधन ( ता. जुन्नर, जि. पुणे ) ........ १०५
४५ ) रायरेश्वर ( ता. भोर, जि. पुणे ) ........ १०७
४६ ) गगन बावडा ( ता. बावडा, जि. कोल्हापूर ) ........ १०८
४७ ) गोरक्षगड ( ता. मुरबाड, जि. ठाणे ) ........ ११०
४८ ) माहुली ( ता. शहापूर, जि. ठाणे ) ........ १११
४९ ) दुर्गाडी किल्ला ( ता. कल्याण, जि. ठाणे ) ........ ११३
५० ) औसा ( भुईकोट किल्ला ) ( ता. औसा, जि. लातूर ) ........ ११५
५१ ) भुदरगड ( ता. भुदरगड, जि. कोल्हापूर ) ........ ११७
५२ ) रत्नदुर्ग ( रत्नागिरीचा जलदुर्ग ) ( रत्नागिरी ) ........ ११९
५३ ) परांडा ( भुईकोट ) ( ता. परांडा, जि. धाराशिव ) ........ १२०
५४ ) मंडणगड ( ता. मंडणगड, जि. रत्नागिरी ) ........ १२२
५५ ) लिंगाणा ( ता. महाड, जि. रायगड ) ........ १२४
५६ ) सागरगड किंवा कुलाबा फोर्ट ( ता. अलिबाग, जि. रायगड ) ........ १२७
५७ ) माहूरगड ऊर्फ रामगड ( ता. किनवट, जि. नांदेड ) ........ १२८
५८ ) ढाक - बहिरीचा किल्ला ( ता. कर्जत, जि. रायगड ) ........ १३१
५९ ) माणेकगड ( ता. पनवेल, जि. रायगड ) ........ १३२
६० ) सुधागड ( ता. सुधागड-पाली, जि. रायगड ) ........ १३४
६१ ) काही प्रमुख सुळके ........ १३६
६२ ) काही प्रमुख कडे / प्रस्तर भिंती ........ १३७
६३ ) घाटमार्ग ........ १३८
भाग ६ : महाराष्ट्रातील घाट व त्याजवळील किल्ले इत्यादी ........ १३९

# १. रायगड

## ( उंची : २८२९ फूट, पायथ्यापासून अंदाजे १२०० फूट )

### ता. महाड, जि. रायगड

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे भक्त शिवरायांच्या आठवणी ज्या किल्ल्यात पाहतात, वाचतात तो म्हणजे किल्ले रायगड. रायगड किल्ला महाराष्ट्राचे नुसते भूषण नसून ते एक पवित्र तीर्थस्थान आहे, असं म्हटल्यास ते वावगं ठरणार नाही. या किल्ल्याचं पूर्वीच नाव रायरी असं होतं. किल्ल्याचा डोंगर उंच व चढण्यास कठीण असून सह्याद्रीच्या मुख्य डोंगर रांगेपासून वेगळा झालेला असल्यामुळे किल्ला अधिक सुरक्षित झालेला आहे. या खासियतीमुळेच शिवाजी महाराजांनी या किल्ल्यावर आपली राजधानी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. इ.स. १६७४ साली या किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा विधीपूर्वक राज्याभिषेक केला गेला. तसेच १६८० साली याच किल्ल्यावर महाराजांचा मृत्यू झाला. ब्रिटिशांनी हा किल्ला जिंकल्यावर बऱ्यापैकी उद्ध्वस्त केलेला होता. तरीही आज अत्यंत मानाने हा किल्ला उभा आहे. रायगड मी किती वेळा चढलो हे न मोजता येण्यासारखेच आहे. मी राजगड प्रदक्षिणा किमान सहा वेळा पूर्ण केलेली आहे, ती पण दरवेळी २०-२५ विद्यार्थ्यांसहित. १९८५ च्या सुमारास श्री शिवछत्रपतींच्या ३००व्या पुण्यतिथीनिमित्त श्री समर्थ व्यायाम मंदिर ते रायगड अशी श्री समर्थ दौड आयोजित केलेली तेव्हा तर दादर ते पाचाड मशाल घेऊन श्री समर्थची मुलं/मुली धावत जाऊन तेथे गडावर मा. मुख्यमंत्र्यांसमोर मल्लखांबाचे प्रात्यक्षिक ठेवलेले. प्रात्यक्षिकांसाठी गाद्यांपासून ते लोखंडी प्लेट्स अशा सर्व गोष्टी खालून वर व पुन्हा वरून खाली असे नेण्या-आणण्याचा प्रयोग एका दिवसातच केलेला होता. असो.

रायगड हा किल्ला महाड शंहरापासून २४ कि.मी. अंतरावर असलेल्या पाचाड गावाजवळ आहे. पाचड गावात महाराजांच्या आईसाहेब जिजाबाई यांचा, किल्ल्याप्रमाणे बांधलेला वाडा आहे. महाराजांच्या राज्याभिषेकानंतर काही दिवसांनी याच वाड्यात जिजाबाईंचा मृत्यू झाला होता. पाचाड गावाजवळ त्यांची समाधी आहे.

किल्ल्याजवळ चढून जाण्यासाठी पायथ्याच्या चित दरवाजापासून वरपर्यंत सुमारे १४५० पायऱ्या बांधलेल्या आहेत. ही चढण दमछाक करणारी असून या वाटेवर किल्ल्याचा अतिशय बळकट असा महादरवाजा आहे. दोन गोल बुरुजांच्या मध्ये असलेलं किल्ल्याचं हे प्रवेशद्वार अतिशय प्रेक्षणीय आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून किल्ल्यावर जाण्यासाठी हिरकणीवाडी या गावातून रोपवेची व्यवस्था झालेली आहे. त्यामुळे आजारी, अपंग तसेच वयोवृद्ध अशा सर्वांना किल्ल्यावर जाता येतं. किल्ल्यावर एकूण पाच मुख्य तलाव आहेत. त्यात हत्ती तलाव, गंगासागर तलाव, काळा हौद, हनुमान टाके आणि कोळींब तलाव अशी त्यांची नावे आहेत. गंगासागर तलावाजवळ असलेला शिवाजी महाराजांचा राजवाडा भव्य असून त्यात सिंहासनाची जागा आहे. त्यावर आता मेघडंबरी उभारलेली असून मेघडंबरीत महाराजांचा पुतळा बसवलेला आहे. या राजवाड्याच्या मुख्य दरवाजाला नगारखाना म्हणतात. यातील खास वैशिष्ट्य म्हणजे हा नगारखाना आणि सिंहासनाची जागा यांच्यामध्ये बरंच अंतर आहे. तरीही सिंहासनाजवळ वाजवलेली टाळी नगारखान्याजवळ तर नगारखान्याजवळ वाजवलेली टाळी सिंहासनाजवळ ऐकू येते. या राजवाड्यात राजदरबाराची जागा, महाराजांचा वाडा आणि त्यांच्या कुटुंबियांचे वाडे होते. ते सर्व आता पडून गेलेले आहेत. त्यांचे ओटे तेवढे चांगल्या स्थितीत असलेले दिसतात.

राजवाड्याच्या आवारात सहा महाल आहेत. त्यांच्या भिंती अजून चांगल्या स्थितीत असल्या तरी आतला सर्व भाग पडून गेलेला आहे. या वाड्यांना राण्यांचे महाल म्हणत. या वाड्यांच्या उजव्या बाजूला असलेल्या दरवाज्याचं नाव मेणा दरवाजा असून डाव्या म्हणजे उत्तर बाजूला असलेल्या दरवाजाला पालखी दरवाजा असं म्हणतात. पालखी दरवाजाजवळ दोन सुंदर मनोरे आहेत. या मनोऱ्यांजवळच गंगासागर तलाव असून संपूर्ण किल्ल्यासाठी याच तलावाचं पाणी वापरलं जात होतं.

गंगासागर तलावाच्या दुसऱ्या काठावर शिर्काई देवीचं लहानसं देऊळ असून जवळच शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळा बसवलेला आहे. पुतळ्यासमोर एका रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंच ओट्यांवर एकंदर ४३ घरांचे अवशेष आहेत. याला बाजारपेठ म्हणतात.

या पेठेतून पुढे डावीकडे गेल्यावर एक कि.मी. अंतरावर टकमक टोक नावाचा एक कडा आहे. या कड्यावरून फितूर व गुन्हेगारांचा कडेलोट करून त्यांना शिक्षा देत असत. पेठेतून उजवीकडे अर्धा कि.मी. अंतरावर जगदीश्वरांचं मंदिर आणि त्याच्या समोरच्या भागात शिवाजी महाराजांची पवित्र समाधी आहे. या समाधीजवळच एका कुत्र्याचा पुतळा उभारलेला आहे. काही जण ती महाराजांच्या लाडका कुत्रा वाघ्या याची समाधी असल्याचं सांगतात, पण त्याला काहीही पुरावा नाही.

या मंदिरापासून पुढे दीड कि.मी. अंतरावर किल्ल्याचं 'भवानी टोक' नावाचं टोक आहे. त्याच्या कपारीत एक गुहा आहे. त्यात पूर्वी भवानीदेवीची मूर्ती होती. या टोकावरून समोर एक महादेवाच्या पिंडीसारखा सुळका दिसतो. तो लिंगाणा किल्ला. त्यावर कैद्यांना ठेवीत असत. जगदीश्वर मंदिराच्या उजव्या बाजूला किल्ल्यावर राहणाऱ्या लोकांची घरे आहेत. या घरांजवळ पाण्याच्या १४ टाक्या असून त्यांना 'बाराटाके' असं म्हणतात.

या टाक्यांजवळ समोरच्या वाघ दरवाजा नावाच्या लहानशा दरवाजाचं दर्शन होतं. संभाजी महाराजांच्या वधानंतर राजाराम महाराज याच दरवाजातून बाहेर पडून मोगलांच्या वेढ्यातून सुटून गेले होते असं सांगतात.

हा वाघ दरवाजा अतिशय कठीण ठिकाणी, कड्याच्या खाली सुमारे ५०० फूट खोल जागी बांधलेला असून त्याची बांधणी अतिशय सुबक आहे. या दरवाजाच्या वरच्या भागात कुशावर्त नावाचा तलाव बांधलेला असून त्याच्या काठावर एक सुंदर महादेव मंदिर आहे. त्याला 'केदारेश्वर मंदिर' असं म्हणतात. या कुशावर्त तलावाच्या परिसरात अनेक मोठमोठ्या वाड्यांचे भग्नावशेष दिसतात. मंत्रीगण आणि सरदारांचे हे वाडे आहेत असं सांगतात. याच परिसरात एक दगडी बांधणीचं पर्जन्यमापक यंत्र असून त्याच्या जवळच एक वृंदावन आहे. किल्ल्यावरच्या राजवाड्याच्या नगारखान्याजवळून या कुशावर्त परिसरात येण्यासाठी चांगली वाट आहे.

किल्ल्याच्या पश्चिम टोकाला हिरकणी बुरूज आहे. किल्ल्याखालच्या हिरकणीवाडीत राहणारी एक गौळण किल्ल्याची दारं बंद झाल्यामुळे हा अवघड कडा उतरून गेली होती; कारण तिचं लहान बाळ घरी एकटेच होतं, अशी एक दंतकथा प्रचलित आहे. त्यावरून या कड्याला हिरकणीचा कडा असं नाव पडलं असं म्हणतात.

रायगड किल्ला कधी बांधला गेला याची निश्चित माहिती मिळत नाही. मात्र तो प्राचीन दुर्ग आहे हे नक्की. पंधराव्या शतकात काही काळ बहमनी राजवटीत, नंतरच्या काळात विजयनगरच्या साम्राज्यात हा किल्ला होता. त्यानंतर १६३६ मध्ये आदिलशाही राजवटीत असतांना तो जावळीच्या चंद्रराव मोरेंच्या

ताब्यात होता. १६५६ मध्ये मोऱ्यांचा पराभव करून किल्ला शिवाजी महाराजांनी घेतला. किल्ल्याचं रायरी हे नाव बदलून त्यांनी 'रायगड' असं नाव ठेवलं. १६६७ पासून किल्ला महत्त्वाच्या घडामोडींचं केंद्र बनला. १६७१-७२ मध्ये महाराजांच्या आज्ञेवरून हिरोजी इंदुलकर या बांधकाम प्रमुखानं किल्ल्यावर महाल, घरे, तलाव, तटबंदी, दरवाजे, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा इत्यादींची निर्मिती केली. तशा अर्थाचा शिलालेख जगदीश्वर मंदिरात एका भिंतीवर कोरलेला आहे. १६६९ साली संभाजी महाराजांचा औरंगजेबानं वध केल्यावर ३ नोव्हेंबर १६८९ रोजी औरंगजेबाचा सरदार झुल्फीकारखानानं किल्ला जिंकून महाराणी येसूबाई व मुलगा युवराज शाहू यांना कैद करून औरंगजेबाच्या छावणीत नेलं.

नंतरच्या काळात मोगलांनी किल्ला जंजिऱ्याच्या सिद्दीच्या ताब्यात दिला. १७३३ साली पेशव्यांनी किल्ला जिंकून स्वराज्यात आणला. शेवटी १८१८ साली, मेजर हॉल व कर्नल प्रॉथर यांनी रायगडाशेजारच्या पोटल्याच्या डोंगरावर तोफा चढवून तिथून किल्ल्यावर मारा करून किल्ल्यावरच्या अनेक इमारती भस्मसात केल्या. नाइलाजानं किल्ल्यावरची शिबंदी शरण गेली. दुसऱ्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई ही त्यावेळी या गडावर होती. इंग्रजांनी तिला पुण्याला पाठवून दिलं. त्यानंतर ब्रिटिशांनी किल्ला वन विभागाच्या ताब्यात दिला. पुढे ८० वर्षांपर्यंत गडावर वावर नव्हता. पुढे १९२६ मध्ये लोकमान्य टिळकांच्या पुढाकारानं रायगडावरच्या महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करण्यात आला. हल्लीच्या काळात काही वर्षांपासून सांगलीच्या शिवप्रतिष्ठानाचे शिवभक्त पाळीपाळीनं दररोज इथे येऊन सिंहासन, पुतळा, शिर्काईदेवी आणि जगदीश्वराची पूजा करतात. त्यात खंड पडत नाही ही मोठ्या कौतुकाची बाब म्हटली पाहिजे.

■■■

## २. प्रतापगड ( सातारा )

( उंची : ४५५६ फूट, पायथ्यापासून अंदाजे १३०० फूट )

ता. महाबळेश्वर, जि. सातारा

महाबळेश्वर डोंगराजवळच्या भोप्याच्या डोंगरावर शिवाजी महाराजांनी मोरोपंत त्रिंबक पिंगळे या प्रधान सचिवांकरवी हा किल्ला बांधून घेतला होता. या मजबूत किल्ल्याचा आकार एखाद्या फुलपाखरासारखा आहे. किल्ल्याभोवती अतिशय घनदाट जंगल असल्यामुळे हा सर्व प्रदेश अतिशय दुर्गम आहे. महाबळेश्वर-महाड मार्गावरील वाडा गावावरून प्रतापगडाच्या पायथ्यापर्यंत वाहने जातात. प्रतापगडावर मी लिखाण करेस्तोवर चार वेळा गेलेलो आहे. गड तसा फार मोठा नसल्याने सहजच लवकर पाहून होतो.

१६५९ साली शिवाजी महाराजांनी याच किल्ल्याच्या पायथ्याच्या जंगलात अफजलखानाच्या प्रचंड सैन्याचा धुव्वा उडवला होता. या ठिकाणी दि. १० नोव्हेंबर १६५९ रोजी राज्यावर चालून आलेला पहाडासारख्या अफजलखानाचा वाघनखे खुपसून शिवाजी महाराजांनी वध केला होता. ह्या जागेवर अफजलखानाचा दर्गा बांधलेला आहे. अफजलखानाच्या वधानंतर महाराजांनी लगेचच मोठी दौड मारून पन्हाळा किल्ल्यापर्यंतचा मुलुख स्वराज्यासाठी जिंकून घेतला होता व मोठा पराक्रम केला होता, म्हणून या किल्ल्याला दिलेले 'प्रतापगड' हे नाव शोभून दिसतं. या गडाची निर्मिती शिवाजी महाराजांनी १६५७-५८ साली केलेली होती. तेव्हापासून ते थेट १८१८ पर्यंत थोडा अपवाद वगळता हा किल्ला कधीही शत्रूच्या ताब्यात गेला नव्हता. आज हा गड छत्रपतींचे वारस, सातारच्या छत्रपती राजघराण्याच्या स्वामित्वाखाली आहे.

१६५६ सालापूर्वी महाबळेश्वरच्या या डोंगररांगेवर एक लहानशी गढी होती. मोऱ्यांकडून जावळी जिंकून घेतल्यावर महाराजांनी मोरोपंत पिंगळे यांना इथे एक किल्ला बांधण्यास सांगितलं. १६६२ साली नेपाळहून शिळा आणून तुळजाभवानीची मूर्ती घडवून तिची स्थापना या किल्ल्यावर करण्यात आली. संभाजी महाराजांच्या काळातही किल्ला स्वराज्यातच होता. जिंजीकडे जात असताना राजाराम महाराज या किल्ल्यावर आले होते. पण मोगल पाठलागावर असल्यामुळे त्यांना इथे जास्त काळ राहता आलं नाही. नंतर मोगलांनी अल्पकाळासाठी किल्ला घेतला. पण १६९० साली रामचंद्रपंत अमात्य आणि शंकराजी नारायण यांनी राजगड, तोरण्यासह प्रतापगडही जिंकून स्वराज्यात आणला. १८१८ साली इंग्रजांनी प्रतापगड ताब्यात घेतला व तो सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या ताब्यात १८२९ साली दिला. तेव्हापासून गड छत्रपती घराण्याच्या ताब्यात आहे.

अफजलखानाचा दर्गा बांधलेला आहे त्या पायथ्यापासून उजवीकडे २०-२५ पायऱ्या चढून गेल्यावर किल्ल्याचं प्रवेशद्वार लागतं. तिथून समोर गेल्यावर एका सोंडेवर बुरूज दिसतो. त्यावर एक तोफ ठेवलेली आहे. या बुरुजावर ध्वज लावण्याची जागा आहे. याला टेहळणीचा बुरूज असं म्हणतात.

हा बुरुज बघून माघारी दरवाजाजवळ परत आल्यानंतर दरवाजाच्या उजव्या बाजूला किल्ल्यावर जाणाऱ्या पायऱ्या लागतात. सुमारे १०० पायऱ्या चढून गेल्यावर उजवीकडे पाण्याची मोठी बारव लागते. याच बारवेचं पाणी किल्ल्यावर पुरवलं जातं. बारवेजवळून काही पायऱ्या चढून गेल्यावर डाव्या बाजूला तुळजाभवानीचं मंदिर लागतं. या देवीची मूर्ती नेपाळच्या गंडकी नदीतून आणलेल्या काळ्या दगडातून बनवलेली आहे. मंदिराच्या आवारात एक तोफ असून ती या देवळाच्या भिंतीला असलेल्या एका उघड्या कमानीत ठेवलेली आहे. या कमानीतून खालचं प्रवेशद्वार आणि समोरचा टेहळणी बुरूज स्पष्ट दिसतात.

देवीची ही काळ्या पाषाणातील मूर्ती अतिशय सुंदर आहे. तिची रोज पूजाअर्चा होते. तिला सुंदर दागिने घातलेले असतात. या देवळात एक मोठी तलवार ठेवलेली आहे. ती शिवाजी महाराजांची भवानी तलवार असल्याचं काही जण सांगतात. मूर्तीजवळच एक स्फटिकाचं शिवलिंग आहे.

देवळातून बाहेर आल्यावर उजवीकडे बालेकिल्ल्याच्या पायऱ्या लागतात. त्या ५०-६० पायऱ्या चढताना उजव्या बाजूला समर्थ रामदासस्वामींनी स्थापन केलेल्या मारुतीचं मंदिर लागतं. पुढे गेल्यावर बालेकिल्ल्याचा दरवाजा लागतो. त्यातून आत गेल्यावर समोर महाराजांची सदर दिसते. तिथे आता फक्त ओटेच तेवढे शिल्लक आहेत. या ओट्यासमोर केदारेश्वर महादेवाचं कौलारू मंदिर आहे.

तिथून उजवीकडे गेल्यावर एक सुंदर बाग लागते. या बागेत शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवलेला आहे. या बागेच्या ठिकाणीच महाराजांचा राजवाडा होता. या किल्ल्याची तटबंदी सुंदर असून मजबूत आहे. तटबंदीमध्ये बऱ्याच ठिकाणी भक्कम बुरूज बांधलेले आहेत. त्यातल्या काही बुरूजांची नावं दक्षिण बुरूज, केदार बुरूज, सूर्या बुरूज, रेडे बुरूज, यशवंत बुरूज अशी आहेत.

या किल्ल्यावर बरीच घरं आहेत. त्यात अजूनही बरेच लोक राहतात. शिवाजी महाराजांच्या काळापासून इथल्या हडप कुटुंबाकडे देवीच्या पूजेची जबाबदारी होती, ती अजूनही तशीच चालत आलेली आहे.

■■■